# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण
## ५/१९ प्राधिकरण बैठक
## एप्रिल ९, २०१९; वेळ ११ : ३० वा सकाळी

## कार्यवृत्तांत

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची ५/१९ ही बैठक दि. ०९/०४/२०१९ रोजी सकाळी ११ : ३० वाजता, मा. अध्यक्ष, मजनिप्रा यांच्या अध्यक्षतेखाली कॉन्फरन्स हॉलमध्ये पार पडली बैठकीस पुढीलप्रमाणे सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

सदस्य

श्री. वि. मा. कुलकर्णी - सदस्य (अभियांत्रिकी)
श्री. विनोदकुमार तिवारी - सदस्य (विधी)
डॉ. एस. टी. सांगळे - सदस्य (अर्थ)

<u>अधिकारी</u>

श्री. रसिक चौहान - सचिव
श्रीमती. नसीमा शेख - रजिस्ट्रार
श्री. रोहन सोडळ - उपसंचालक
श्री. प्र. भि. गोखले - उपसंचालक
श्री. किशोर देशमुख - सहाय्यक संचालक

सचिव, मजनिप्रा यांनी मा. अध्यक्ष, मजनिप्रा यांनी मान्य केलेली कार्यसूची बैठकीत चर्चेसाठी ठेवली. अध्यक्ष महोदयांच्या सूचनेनुसार कार्यसूचीवरील बाबींचा क्रम बदलून त्यानुसार खाली नमूद केल्याप्रमाणे चर्चा झाली.

**<u>मुद्दा क्र. १</u> :- पारित केलेल्या प्रलंबित ठरावांवरील कार्यवाहीचा अहवाल**

सचिव यांनी कार्यवाही प्रलंबित असलेल्या व अंशत: कार्यवाही झालेल्या ठरावांबाबतची माहिती प्राधिकरणाच्या बैठकीत उपलब्ध करून दिली त्यावर सविस्तर चर्चा झाली व अंशत: कार्यवाही झालेल्या तसेच कार्यवाही प्रलंबित असलेल्या ठरावांवर करावयाची कार्यवाहीबाबतचे प्राधिकरणाकडून प्राप्त झालेले निर्देश सोबतच्या तक्ता - अ (Annexure - A) मध्ये दर्शविले आहेत.

<u>मुद्दा क्र. २</u>:- **To participate in the Third World Irrigation Foram ( WIF 3) and Host Supporting event at WIF 3 to be held on 1-7 September, 2019 at Bali, Indonesia.**

Authority suggested to resubmit note in the next meeting which shall include all the necessary details such as the expenditure, nominations for the event, as well as the likely benefit of participation in conference, in the next meeting.

<u>मुद्दा क्र. ३</u>:- **मजनिप्रातील अधिकारी / कर्मचारी यांना इतर भत्ते / सोयी सुविधा ऐवजी लागू करण्यात आलेली ठोक रक्कम सुधारीत करण्याबाबत.**

बैठकीसाठी विहित नमुन्यातील टिप्पणी पुढील बैठकीपूर्वी सात दिवस अगोदर सर्व सदस्यांना उपलब्ध करून देण्याच्या सूचना प्राधिकरणाने दिल्या. प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्याचा निर्णय झाला.

<u>मुद्दा क्र. ४</u>:- **शासनाने निर्गमित केलेले प्राधिकरणाच्या कामकाजाशी सुसंगत असलेले शासन निर्णय स्विकृत करून प्राधिकरण निर्णय पारित करण्याबाबत.**

प्राधिकरणाच्या बैठकीत विचारार्थ खालील ९ शासन निर्णय ठेवण्यात आले होते.

| अनु. क्र. | विषय |
|---|---|
| १ | शासन निर्णय वित्त विभाग क्र. अकाभ - १३११/ प्र.क. ९ / सेवा - ६, दि. ९/०९/२०११ शासकीय वाहन चालकांना देण्यात येणाऱ्या अतिकालिक भत्त्यामध्ये वाढ |
| २ | शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एमएजी २००५/९/प्र.क. १/ आरोग्य ३, दिनांक १९ मार्च, २००५ शासकीय कर्मचाऱ्यांनी व त्यांच्या कुटूंबियांनी आकस्मित निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रूगणालयातील आंतररूग्ण उपचाराच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या मंजूरीबाबत. |
| ३ | शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. सार्वजनिक आरोग्य विभाग वैखप्र - २०११ / प्र.क. ३३३ /११/ राकावि - २, दि. ११/११/२०११ वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रयोजनार्थ " **अवलंबित्व** " **ठरविण्यासाठी उत्पन्नावरील मर्यादा सुधारण्याबाबात** .... शासकीय कर्मचाऱ्याचे आईवडील आणि अविवाहित व घटस्फोटीत बहिणीसंदर्भात |
| ४ | शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग वैखप्र- २०१६ / प्र.क. २८५/२०१६/ राकवि - २, दिनांक २८/०९/२०१६, शासकीय कर्मचाऱ्यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी कर्करोग या गंभीर आजारावर शासकीय व शासनमान्य खाजगी रूगणालय वगळून इतर खाजगी रूग्णालयात घेतलेल्या उपचाराच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मंजूरीबाबत. |
| ५ | शासन निर्णय वित्त विभाग क्र. वाहन २०१४ / प्र.क. २३/१४/ विनियम, दि. ३० मे २०१४<br>शासकीय वाहनांचा खाजगी कामासाठी वापर दर सुधारणा |

| | |
|---|---|
| ६ | अ) शासन क्र. वित्त विभाग वेतन - १३११ / प्र.क. १७/ सेवा - ३, दि. २७/१२/२०११<br>ब) शासन शुध्दीपत्रक क्र. वित्त विभाग वेतन - १३११ / प्र.क. १७/ सेवा - ३, दि. २८/०८/२०१३,<br>दोन किंवा अधिक पदांवरील नियुक्तीच्या कालावधीतील अतिरिक्त वेतन/ विशेष वेतनाच्या दरात सुधारणा करणे |
| ७ | अ) शासन निर्णय वित्त विभाग क्र. प्रवास १०१० / प्र.क्र. २/सेवा - ५, दि.०३/०३/२०१०<br>ब) शासन निर्णय वित्त विभाग क्र. प्रवास १०११ /प्र.क्र. २२/सेवा - ५, दि.२७/१२/२०११<br>क) शासन निर्णय वित्त विभाग क्र. प्रवास १०११/प्र.क्र. २२/सेवा ५, दि.१२/०१/२०१२<br>ड) शासन निर्णय क्र. प्रवास १०१३/प्र.क्र. ०३/सेवा ५ ,दि. ०२/०५/२०१३ शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या प्रवास भत्ता व दैनिक भत्त्याच्या दरात सुधारणा |
| ८ | शासन निर्णय क्र. वित्त विभाग मभवा - २०१९ / प्र.क. २/ सेवा - ९, दि. १/०२/२०१९<br>सुधारित वेतन संरचनेच्या अनुषंगाने सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर करण्याबाबत |
| ९ | शासन निर्णय क्र. वित्त विभाग घभाभ - २०१९ / प्र.क. २/ सेवा - ५, दि. ०५/०२/२०१९<br>राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना सुधारित दराने घरभाडेभत्ता मंजूर करण्याबाबत.. |

प्रत्येक शासन निर्णयावर सविस्तर चर्चा झाली. अ.क्र. १ व ५ ते ९ येथील शासन निर्णय प्राधिकरणाच्या कामकाजाशी सुसंगत असल्याने शासन निर्णय मजनिप्रा, विनियम २०१३ मधील तरतुदींच्या अधीन स्विकृत केले. अ.क्र. २ ते ४ येथील प्रस्ताव पुढील बैठकीत विचारार्थ ठेवण्याचे निर्देश प्राधिकरणाने दिले. चर्चेमध्ये पर्यायी योजना म्हणून Cashless विमा योजना राबविणे शक्य आहे का ? या पर्यायाचाही विचार करण्यात यावा असे ठरले.

<u>ठराव क्र. ३५</u>

ज्याअर्थी, वरील तक्त्यात दर्शविलेले अ.क्र. १ व ५ ते ९ येथील शासन निर्णय प्राधिकरणाच्या कामकाजाशी सुसंगत आहेत व प्राधिकरणाच्या दैनंदिन कामकाजासाठी त्यांची आवश्यकता आहे.

त्याअर्थी, हे शासन निर्णय प्राधिकरणाने सोबतच्या तक्त्यात दर्शविलेल्या तपशिलानुसार प्राधिकरण निर्णय निर्गमित करण्याकरिता स्वीकृत केले आहेत.

<u>मुद्दा क्र. ५</u>:- महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २०९ च्या कलम ८(१) अन्वये राजाच्या सर्व पाणलोट क्षेत्रामध्ये कृषी व औद्योगिक वापरासाठी ६० मी. पेक्षा खोल विहीरी खोदण्यास प्रतिबंध करणे आणि नसलेल्या क्षेत्रात विशिष्ट परिस्थितीत पिण्याच्या पाण्यासाठी ६० मीटरपेक्षा जास्त खोलीची विहिर / विंधन विहिर / कूपनलिका खोदण्यास विनिर्दीष्ट परवानगी देणे.

महाराष्ट्र भूजल (वि व व्य) अधिनियम २००९ मधील कलम १४ नुसार राज्य भूजल प्राधिकरणाचे अधिकाराचे प्रत्यायोजन महसूल विभागाच्या उप विभागीय अधिकारी (जिल्हा प्राधिकरण) यांना प्राधिकृत करणे व अनधिसूचीत क्षेत्रात कृषि आणि औद्योगिक वापरासाठी ६० मीटरपेक्षा जास्त खोलीची विहिर/ विंधन विहिर/ कूपनलिका खोदण्यास प्रतिबंध करणेबाबत.

दि. ९ एप्रिल २०१९ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकी मध्ये वरिल विषयावर झालेल्या चर्चेचे इतिवृत्त खालील प्रमाणे आहे.

बैठकी मध्ये मा. अध्यक्षांच्या सुचनेवरुन सहसंचालक (भूजल) यांनी विषयाची पार्र्श्वभुमी मांडून या बाबतीत मा अध्यक्षांसोबत पूर्वी झालेल्या चर्चेचा वृत्तांत सांगितला.

सन २०१५ मध्ये, तत्कालीन प्राधिकरणाने,महाराष्ट्र भूजल(विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ च्या कलम ८(१) अन्वये, राज्यातील ८० अतिशोषीत आणि शोषित पाणलोट क्षेत्रामध्ये कृषी आणि ओद्योगिक वापरासाठी ६० मिटर पेक्षा खोल विहिरी घेण्यास दि. ३१ जुलै २०१५ रोजी प्रतिबंध करण्यासाठी आदेश निर्गमीत केलेला होता, ज्यामध्ये भूजल अधिनियमातील कलम १४ अन्वये पिण्याच्या पाण्यासाठी खोल विहिरी घेण्यास परवानगी देण्याचा राज्यभूजल प्राधिकरणाचा अधिकार संबंधित जिल्हा प्राधिकरणाला देण्यात आला आहे. परंतू पिण्यासाठी खोल विहिरी घेण्याकरिता परवानगी देण्यासाठी, भूजल (विकास व व्यवस्थापन) नियम २०१८ च्या नियम क्र.७ मध्ये विहीत केलेल्या पद्धतिचा उल्लेख यात नाही. कारण त्यावेळला नियमांचा मसुदा तयार झालेला नव्हता.

बैठकीत सदस्यांमध्ये यावर सविस्तर झाली की, अशा प्रकारे निर्गमीत केलेल्या आदेशामध्ये खोल विहिरी घेण्याकरिता परवानगी देण्यासाठी भुजल (विकास व व्यवस्थापन) मसुदा नियम २०१८ च्या नियम क्र.७ मध्ये विहीत केलेल्या पद्धतिचा उल्लेख न करता, खोल विहिरी घेण्याकरिता परवानगी देण्याचा राज्यभूजल प्राधिकरणाचा अधिकार संबंधित जिल्हा प्राधिकरणाला देण्यात आला आहे. त्यामुळे भूजल वापरकर्ते यांना परवानगी घेण्यासाठी आणि जिल्हाप्राधिकरण यांना परवानगी देण्यासाठी सुस्पष्ट पद्धत नसल्यामुळे संभ्रम निर्माण होवु शकतो. चर्चेअंती, मा. अध्यक्ष यांनी प्राधिकरणाचा याबाबत अंतिम निर्णय जाहिर केला की, दि. ३१ जुलै २०१५ रोजी ६० मिटर पेक्षा खोल विहिरी घेण्यास प्रतिबंध करण्यासाठीचा तत्कालिन प्राधिकरणाचा आदेश, ज्यामध्ये पिण्यासाठी खोल विहिरी घेण्याकरिता परवानगी

देण्यासाठी भूजल (विकास व व्यवस्थापन)मसुदा नियम २०१८ च्या नियम क्र.७ मध्ये विहीत केलेल्या पद्धतिचा उल्लेख नसल्याने रद्द करुन मागे घेण्यात येत आहे.

सदस्य (जसं-अभि) आणि सदस्य (विधी) यांनी महाराष्ट्र भुजल (विकास व व्यवस्थापन) मसुदा नियम २०१८ वर चर्चा केली. सदस्य(विधी) यांनी सांगितले कि,सदर चे नियम राजपत्रामध्ये शासनाने प्रसिद्ध केले असल्याने ते अस्तित्वात आलेले आहे. यापुढे अधियमातील कलम ५७ अन्वये हा मसुदा दोन्ही सभागृहापूढे त्यांच्या सुचना घेण्यासाठी ठेवण्यात येईल. सभागृहातील सदस्यांच्या योग्य सूचना आल्यातर त्या समाविष्ट केल्या जातील. अधियमातील कलमांतर्गत असलेल्या तरतुदिंनुसार यादरम्यानच्या काळात काही कामकाज केल्या गेले तर ते ग्राह्य समजण्यात येईल. त्यामुळे यानियमानुसार राज्य प्राधिकरण आता कामकाज करु शकते. सदस्य (जसं-अभि) यांनी याबाबत सांगितले की, सदर नियम हे अंतिमरित्या अधिसुचित झालेले नसल्याने ते शासनाने अंतिम केले असे म्हणता येणार नाही. त्यामुळे नियम अंतिम होण्याआधी त्यानुसार प्राधिकरणाला कामकाज करता येणार नाही. तसेच त्यांनी मुख्य सचिवांच्या दि. ३१जानेवारी, २०१९ रोजी महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) नियम २०१८च्या मसुदा अंतिम करण्याकरिता झालेल्या बैठकिच्या इतिवृत्ताचा दाखला देत सांगितले की, महाराष्ट्र भूजल (वि व व्य) अधिनियम २००९ मधील कलम ८(१) अन्वये खोल विहिर खोदण्यास परवानगी सार्वजनिक विहिरींना द्यावी,खाजगी उपयोगासाठी देवू नये. यावर सदस्य(विधी) यांनी सांगितले की, अशी तरतुद भूजल अधिनियमात नाही.

याविषयावर सदस्य व अध्यक्ष यांमध्ये सविस्तर चर्चा झाली. सर्व चर्चे अंती, मा. अध्यक्ष यांनी याबाबत निर्णय दिला की, याबाबत सखोल व सविस्तर चर्चा करण्यासाठी प्राधिकरणाची पुढील बैठक दि. २९ एप्रील २०१९ नंतर लावून हा विषय बैठकीपुढे ठेवण्यात यावा.

प्राधिकरणाकडून प्राप्त झालेले कार्यवाहीबाबतचे आदेश सोबतच्या परिशिष्ट - ब (Annexure - B) मध्ये दर्शविले आहेत.

**<u>मुद्दा क्र. ६</u>:-** **राज्यातील जलसंपदा प्रकल्पांच्या लाभक्षेत्रातील तसेच शासन प्रणित / वैयक्तिक / सहकारी उपसा सिंचन योजनांच्या क्षेत्रांमध्ये पाण्याची बचत करण्यासाठी तसेच पाण्याची उत्पादकता वाढविण्यासाठी ऊस, केळी, फळबागा अशा बारमाही पिकांना ठिबक / तुषार सिंचन पध्दत अनिवार्य करण्याबाबत.**

बैठकीत ठरावच्या मसुद्यावर सविस्तर चर्चा झाली. चर्चे दरम्यान मा.सदस्य ( अभि.) यांनी असे निदर्शनास आणून दिले कि, सादर प्रारूप ठरावमध्ये नमूद केल्याप्रमाणे मजनिप्रा अधिनियम २००५ मधील कलम १४ (४) हे कालव्यावरील ठिबक सिंचन , तुषार सिंचन अथवा प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या अन्य पाण्याची बचत करणारे तंत्र वापरल्याखेरिज कालव्यातून पाणी दिले जाणार नाही, या अनुषंगाने आहे. कालव्यामार्फत ठिबक / तुषार सिंचनासाठी ३६५ दिवस पाणी उपलब्ध होवू शकणार नाही. प्रकल्पाचे

जलाशयातून ठिबक व तुषार सिंचनासाठी ३६५ दिवस पाणी उपलब्ध होवू शकते. तसेच विद्युत पुरवठा सुध्दा उपलब्ध होवू शकतो.

मजनिप्रा अधिनियम २००५ मधील कलम २ (२) मध्ये *"या अधिनियमात वापरलेले आणि व्याख्या न केलेले परंतू राज्यातील विविध पाटबंधारे किंवा जलसंपती यांच्याशी सबंधीत अधिनियमांमध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, त्या त्या अधिनियमांत ते अर्थ नेमून दिलेले असतील, तेच अर्थ असतील"* असे नमूद केले आहे.

महाराष्ट्र पाटबंधारे कायदा १९७६ च्या कलम ३ (क) "कालवा" या मध्ये **"पाण्याचा पुरवठा किंवा साठा करण्यासाठी समुचीत प्राधिकरणाने बांधलेले, सुस्थितीत ठेवलेले किंवा त्याचे नियंत्रण सर्व कालवे, जलमार्ग, जलवाहिन्या, नलिकाकूप, घरगुती पाणी पुरवठयाची बांधकामे आणि जलाशय या गोष्टीचा समावेश होईल "** असे नमूद केले आहे.

मजनिप्रा अधिनियम २००५ मधील कलम १४ (४) या सह मजनिप्रा अधिनियम २००५ मधील कलम २ (२) व महाराष्ट्र पाटबंधारे कायदा १९७६ च्या कलम ३ (क) यांचा उल्लेख करून ठरावाच्या मसुदा सुधारित करून प्राधिकरणाचे पुढील बैठकीत ठेवणेबाबत मा. अध्यक्ष यांनी निर्देश दिले.

**<u>मुद्दा क्र. ७</u>:- वरोरा औद्योगिक क्षेत्रासाठी मौजा – माडा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर येथे वर्धा नदीवर २१ दलघमी क्षमतेचा बांधारा बांधण्यासाठी मजनिप्राची मान्यता मिळणेबाबत.**

सदर विषय प्राधिकरण बैठकीमध्ये सादर झाल्यावर सदस्य (अभि.) यांनी विषयांकित प्रकल्प जानेवारी २०१६ मध्ये प्रथम प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर झाल्यावर प्राधिकरणाने गोदावरी खोऱ्याचा एकात्मिक राज्य जल आराखडा (ISWP) अद्याप मंजूर झालेला नसल्याने मजनिप्रा अधिनियम कलम ११(च) अन्वये मान्यता देता येत नसल्याने प्रस्ताव परत केला होता. **गोदावरी खोऱ्याचा सदर आराखड्यास दि. ३०/११/२०१७ रोजी मंजूर मिळाल्यानंतर प्रस्ताव फेरसादर करण्यात आला. तसेच राज्य जल परिषदेने ११/०२/२०१९ रोजी** ISWP मंजूर केल्याने तसेच विषयांकित प्रकल्पाचा ISWP मध्ये समावेश असल्याने मजनिप्रा अधिनियम कलम ११(च) अन्वये मान्यता देण्यास हरकत नसल्याचे सांगितले. सदस्य (विधि) यांनी प्राधिकरणाची मान्यता न घेता विषयांकित प्रकल्पाचे बांधकाम २०१२ साली सुरू होऊन २०१७ मध्ये पूर्ण झाल्याने कायद्याचा भंग झालेला आहे. तसेच विषयांकित प्रकल्पास पर्यावरण मान्यता नसतांनाही प्रकल्पाचे बांधकाम करण्यात आल्याने संबंधितांवर कार्यवाही करणे आवश्यक आहे. यावर सदस्य (अभि.) यांनी पर्यावरण विभाग, मुंबई यांच्या दि. २४/०२/२०११ रोजीच्या पत्रानुसार विषयांकित प्रकल्पास पर्यावरण मान्यतेची आवश्यकता नसल्याचे सांगितले.

मा. अध्यक्ष यांनी सदस्य (विधि) यांनी विषयांकित प्रकल्पाचा प्रस्ताव परत तपासण्याचे निर्देश दिले.

HELD AT ______ ON ______ TIME ______

उपरोक्त बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. अध्यक्षांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.

( के. पी. बक्षी)
अध्यक्ष, मजनिप्रा

## Annexure -A

**Remarks of Authority in 5/19 Meeting held on 09/04/2019 on Partially Complied Resolutions.**

| Sr. No. | Partially Compiled Resolution No. | Resolution | Remark | Responsible officer |
|---|---|---|---|---|
| 1. | **Resolution No.4**<br>Authority Meeting No 1/2017, dt. 28/08/2017 | विषय :- मजनिप्रा अधिनियमांचे व त्याखालील नियमांचे पुनर्विलोकन करण्याबाबतचे काम नियुक्त सल्लागार KPMG ला सोपविण्याबाबत<br>Work of Review of MWRRA Act, 2005 and subsequent amendments, various rules under the said Act and State Water Policy be assigned to KPMG. | To Remind WRD | P.R Khire, Consultant |
| 2. | **Resolution No. 14**<br>Authority Meeting No 3/2018, dt. 06/02/2018 | **Sub :- proposal of creation of the 14 posts**<br>Resolved that the proposal of creation of the 14 posts be sent to Government for sanction. | Registrar to pursue. Reminder to C.S under Signature of Hon. Chairman. | Registrar |
| 3. | **Resolution No. 17**<br>Authority Meeting No 4/2018, dt. 25/04/2018 | **Sub:- In the Matter of adverse effects on sustainability of Irrigation / WRD Schemes due to outstanding payments towards supply of Bulk Water Charges to be recovered by Water Resource Department from Domestic & Industrial Bulk Water Utilities in the State of Maharashtra.**<br>**IT IS HEREBY RESOLVED THAT** the Parties / Respondents named above be asked;<br>1) To submit details on Affidavit of such outstanding dues payable to WRD by Municipal Corporations, Municipal Councils, Industrial Townships, Nagar Panchayats, Gram Panchayats etc local bodies, | To issue show cause to all concerned why the affidavit as directed, have not been led & give opportunities to file affidavit with complete details of Arrears due/ outstanding. | Member (Law) |

| Sr. No. | Partially Compiled Resolution No. | Resolution | Remark | Responsible officer |
|---|---|---|---|---|
| | | Private Townships, Maharashtra Industrial Development Corporation, CIDCO, Public & Private Sector Companies, Firms, Organization, Societies, Trust, Commercial establishments etc.<br>2) To submit details of water supply agreements which have been signed and executed with WRD or the Irrigation Development Corporations which are in existence and/or neither been singed nor been renewed years together due to such outstanding dues recovery, even then water is being supplied regularly, in spite of such huge recovery and it's impact on the working of WRD Department.<br>3) To submit the Affidavits along with all such relevant information, details and particulars called upon herein above to the extent and concerned to their respective departments after collecting it from all concerned within six weeks from the receipt of this Order. | | |
| 4 | **Resolution No. 26**<br><br>Authority Meeting No 14/2018, dt. 9/12/2018 | **Subject :- To implement the provision of Maharashtra Groundwater (D & M) Act, 2009 in the capacity as the State Groundwater Authority in the areas of Mumbai Metropolitan Region**<br><br>NOW IT IS THEREFORE RESOLVED THAT, implementation of the provisions of Maharashtra Groundwater (D & M) Act, 2009 be taken up within the jurisdiction of the Municipal Council of Greater Mumbai (MCGM) with the technical | Reminder to C.S & 26 Notice to Joint Secretary . | Asstt. Director, K. N. Deshmukh |

| Sr. No. | Partially Compiled Resolution No. | Resolution | Remark | Responsible officer |
|---|---|---|---|---|
| | | assistance of GSDA in order to prohibit the over exploitation of the groundwater as well as its commercial trade wherever not permissible under the Act and hence call for all such necessary details from BMC as well as all other agencies involved in the matter as well as establishment of District Authorities in the areas of revenue districts of Mumbai urban region within a period of **one** month. | | |
| 5 | **Resolution No. 32** Authority Meeting No 4/2019, dt. 11/03/2019 | विषय :- उपरोक्त विषयावर सविस्तर चर्चा झाली व 'वरिष्ठ संचालक' या पदाची मजनिप्रा या कार्यालयास आवश्यकता असल्याने पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.<br>ज्याअर्थी शासन निर्णय संकीर्ण - २००५ (१४९/०५ ) एल.बी. १ / जसंअ, दि. ११/११/२००५ अन्वये, मंत्रिमंडळ व उच्चस्तरीय समितीच्या मान्यतेने वरिष्ठ संचालक हे पद इतर पदासह निर्माण केले होते;<br>व पुढे ज्याअर्थी सदर 'वरिष्ठ संचालक' हे पद मजनिप्रा (सेवाप्रवेश आणि कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या शर्ती) विनियम, २०१३ या विनियमाद्वारे उपसंचालक ( भूजल ) म्हणून पदावनत केले आहे.<br>तथापि, ज्याअर्थी 'वरिष्ठ संचालक' (३७,४०० - ६७,००० ग्रेड पे ८,९००/- ) या पदाची मजनिप्रा च्या आस्थापनेवर कामाच्या वाढत्या प्रमाणामुळे आवश्यकता भासत आहे. | प्रस्ताव शासनास पाठवावा. | Registrar |

| Sr. No. | Partially Compiled Resolution No. | Resolution | Remark | Responsible officer |
|---|---|---|---|---|
| | | त्याअर्थी उपसंचालक (भूजल) हे पद 'वरिष्ठ संचालक' ( वेतनश्रेणी ३७,४०० – ६७,००० ग्रेड पे ८,९००/- ) या पदामध्ये पुन:स्थापित करण्याचा व विनियमात दुरूस्ती करण्यासाठी तसा प्रस्ताव शासनास स्वतंत्रपणे पाठविण्याचा ठराव पारित करण्यात येत आहे. | | |
| 6 | **Resolution No. 34**<br><br>Authority Meeting No 4/2019, dt. 11/03/2019 | **विषय :- उपसंचालक (भूजल) या पदाची सुरू केलेल्या भरतीप्रक्रीयेबद्दल मा. अध्यक्ष व सचिव यांनी स्वतंत्रपणे निर्णय घ्यावा.**<br><br>उपसंचालक (भूजल) या पदाची सुरू केलेल्या भरतीप्रक्रीयेबद्दल मा. अध्यक्ष व सचिव यांनी स्वतंत्रपणे निर्णय घ्यावा. | प्रस्ताव अध्यक्ष महोदयांकडे सादर करावा. | Registrar |

# परिशिष्ट - ब

महाराष्ट्र भूजल (वि व व्य) अधिनियम २००९ मधील कलम १४ नुसार राज्य भूजल प्राधिकरणाचे अधिकाराचे प्रत्यायोजन महसूल विभागाच्या उप विभागीय अधिकारी (जिल्हा प्राधिकरण) यांना प्राधिकृत करणे व अधिसूचीत क्षेत्रात कृषि आणि औद्योगिक वापरासाठी ६० मीटरपेक्षा जास्त खोलीची विहिर/ विंधन विहिर/ कूपनलिका खोदण्यास प्रतिबंध करणेचा पूर्वीचा आदेश मागे घेणे.

दिनांक:- १७/०५/२०१९

## आदेश

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन राजपत्र,असाधारण भाग चार-ब मधील असाधारण क्र. २४० दि. २५ जुलै २०१८ च्या अधिसूचनेद्वारे, महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ च्या नियमांचा मसुदा महाराष्ट्र भुजल (विकास व व्यवस्थापन) नियम २०१८ या नावाने प्रसिध्द झालेला आहे,

ज्याअर्थी, यामधील नियम क्र. ७ मध्ये पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनार्थ खोल विहीरी खोदण्यासाठी परवानगी मिळण्यासाठी पद्धत विहीत केलेली आहे,

ज्याअर्थी, सन २०१५ मध्ये तत्कालीन प्राधिकरणाचा, महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ च्या कलम ८(१) अन्वये राज्यातील ८० अतिशोषीत आणि शोषित पाणलोट क्षेत्रामध्ये कृषी आणि ओद्योगिक वापरासाठी ६० मिटर पेक्षा खोल विहिरी घेण्यास दि. ३१ जुलै २०१५ रोजीचा प्रतिबंध आदेश, ज्यामध्ये भूजल अधिनियमातील कलम १४ अन्वये पिण्याच्या पाण्यासाठी खोल विहिरी घेण्यास परवानगी देण्याचा राज्यभूजल प्राधिकरणाचा अधिकार संबंधित जिल्हा प्राधिकरणाला देण्यात आला आहे, परंतू पिण्यासाठी खोल विहिरी घेण्याकरिता परवानगी देण्यासाठी, भुजल (विकास व व्यवस्थापन) नियम २०१८ च्या नियम क्र.७ मध्ये विहीत केलेल्या पद्धतिचा उल्लेख नाही,

त्याअर्थी,याआदेशाद्वारे तत्कालीन राज्य प्राधिकरणाचा दि. ३१ जुलै २०१५ रोजीचा कृषी आणि ओद्योगिक वापरासाठी ६० मिटर पेक्षा खोल विहिरी घेण्यास प्रतिबंध करणारा आदेश मागे घेण्यात येत आहे.

अध्यक्ष
महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण
तथा राज्य भूजल प्राधिकरण